उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकीत्सक, मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर -०३ येथील एकुण ४९ अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/प्र.क्र.९९ /आरोग्य-३ अ

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१
दिनांक: ११ एप्रिल, २०१९

वाचा -

1) शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अपदे २०१८/प्र.क्र.९९/आरोग्य-३ अ, दि. ३० ऑक्टोबर,२०१८
2) सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये) राज्यस्तर,मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-१२/मुंबईमंडळ,ठाणे/अपदेमुदतवाढ/सन१९-२०/५३४३-४४/१९ दि.३/४/२०१९
3) शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि.२१/२/२०१९

शासन निर्णय-

संदर्भाधिन क्र.१ येथील शासननिर्णय क्र.अपदे २०१६/प्र.क्र.९९/ आरोग्य-३अ, दि.३०/१०/२०१८ अन्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकीत्सक ०३- उल्हासनगर ,मध्यवर्ती रुग्णालय ,येथील एकुण ४९ अस्थायी पदांना पदे चालू ठेवण्यास दि.१/१०/२०१८ ते दि.२८/२/२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

२. संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दि.१/३/२०१९ ते दि.३०/९/२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर ४९ अस्थायी पदाना शासन निर्णय वित्त विभाग क्र पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि.२१/२/२०१९ मधील अटीच्या अधीन राहून दिनांक १/३/२०१९ ते दिनांक ३०/९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२० या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-१

२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०६ - नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा

११०- रुग्णालये व दवाखाने

११०-२- मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये व दवाखाने

(०१)(०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापन्नेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने

(२२१० ०१४६)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०१११५८२५०११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef30cb7b664b40931538c1bc532d12b8f769b464113ab890f880b12d2700c2cb, cn=Roshani Dinesh Kadam Patil
Date: 2019.04.11 11:39:54 +05'30'

(रो.दि. कदम-पाटील)
(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर

२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण अभियान, मुंबई.

३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

४) सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालय- राज्यस्तर), मुंबई

५) सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), मुंबई

६) उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, ठाणे.

७) जिल्हा शल्य चिकीत्सक, मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

८) वैद्यकीय अधिक्षक,शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-

९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ठाणे

१०) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे

११) वित्त विभाग (व्यय १३)/वित्तीय सुधारणा-१/आपुक/, मंत्रालय, मुंबई

१२) अवर सचिव/कक्ष अधिकारी (सेवा-२, सेवा-३, सेवा-५, अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) निवडनस्ती(आरोग्य-३अ)